# मुंबईच्या पोटातून सुपरफास्ट प्रवास

## १०० फूट खोलीवर मेट्रोचे वेगाने काम

तेजस वाघमारे / कृष्ण जोशी : सकाळ वृत्तसेवा

**मुंबई, ता. १९ : जमिनीत १०० फूट खोल... बाहेरची हवा, सूर्यप्रकाश वा मोबाईलची रेंज काहीच आत येऊ शकत नाही, अशा मेट्रोच्या बोगद्यात तंत्रज्ञ, अभियंते आणि कामगार रात्रंदिवस राबत आहेत. मुंबईकरांना सुखाचा, वेगवान आणि वातानुकूलित प्रवास करता यावा म्हणून ते जिवाची बाजी लावत आहेत... त्याचाच अनुभव 'टीम सकाळ'ने घेतला.**



टनेल बोअरिंग मशीन खाली उतरवून खणण्यात येत असलेले बोगदे. लांबच लांब असलेल्या बोगद्यात कामगारांना श्वास घेणे सुसह्य होण्यासाठी ब्लोअर सोडण्यात आले आहेत. (छायाचित्रे : प्रशांत चव्हाण)

### १०० फूट खाली उतरून ट्रॉलीतून प्रवास

कुलाबा ते सिप्झ भूमिगत रेल्वेमार्गाचे काम वेगवेगळ्या टप्प्यांत सुरू आहे. त्यात नयानगरच्या साईटवर 'टीम सकाळ'ने १०० फूट खाली उतरून टनेलमधील मेट्रोमार्गावर ट्रॉलीतून प्रवास केला. भविष्यातील मुंबईकरांचा प्रवास कसा असेल याची एक झलकच त्या निमित्ताने दिसली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने हे काम किती सोपे झाले आहे, याची प्रचीतीही आली.



2 टनेलमधील ट्रॉलीतून 'टीम सकाळ'ने जवळपास १२०० मीटरचा प्रवास करून टनेल बोअरिंग मशीन गाठले. मशीनने बोगदा खणला व त्याचा राडारोडा मालगाडीत टाकला की, बोगद्याला आतून मजबूत सिमेंट काँक्रीटचे बांधकाम केले जाते. त्यानंतर तेथे या सेगमेंट क्षणार्धात बसवल्या जातात. अजस्त्र यांत्रिक हातही सेगमेंट उचलून जागेवर ठेवतात व एक इंच जाड आणि फूटभर लांब 'स्क्रू'च्या साह्याने ती सेगमेंट शेजारच्या सर्व सेगमेंटला जोडली जाते. अशा प्रकारे त्या बोगद्यातील प्रत्येक सेगमेंट ही एकमेकांशी जोडली जाऊन कमानीची एक अभेद्य कडीच तयार झाली आहे.